# परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्यात विविध संतांचा सहभाग

## अनुक्रमणिका

विषयसूची


* अखिल मानवजातीचा उद्धार करणारी सनातनची ग्रंथसंपदा! ८
* संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ९
* मनोगत १२
* प्रकरण १३

---

१. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याला विविध संतांनी केलेले साहाय्य १४

२. परात्पर गुरु डॉ. आठवले आणि सनातनचे साधक यांना होणाऱ्या वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणार्थ विविध संतांनी केलेले साहाय्य ३८

३. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्यावरील अरिष्टे टाळण्यासाठी विविध संतांनी केलेले साहाय्य! ५३

४. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याला नाथ संप्रदायाकडून होणारे साहाय्य ६१

५. परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्याशी विविध संतांचे असलेले ऋणानुबंध! ६८

६. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचा संतांविषयी असलेला कृतज्ञताभाव! ९०

# मनोगत

सनातन धर्माच्या पुनरुत्थानासाठी आणि त्याची अवघ्या विश्वात प्रस्थापना करण्यासाठी सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी आरंभलेले कार्य वेगाने सातासमुद्रापार पसरू लागले आहे. या कार्यात ईश्वरी कृपेने अनेक संतांनी बहुमोल वाटा उचलला किंवा त्यासाठी परात्पर गुरु डॉ. आठवले यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हेच या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याची दखल सप्तपाताळांतील आसुरी शक्तींनीही घेतली आहे. त्यांना परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या सर्वव्यापी कार्याची धास्ती वाटते; म्हणून त्या परात्पर गुरु डॉ. आठवले आणि साधक यांना गेली अनेक वर्षे विविध प्रकारे त्रास देत आहेत. या त्रासांच्या निवारणार्थ विविध संतांनी आतापर्यंत साहाय्य केले आहे. याचीही नोंद या ग्रंथामध्ये करणे आवश्यकच होते.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी स्वतः त्यांना विविध संतांनी केलेले साहाय्य, तसेच विविध संतांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कृतज्ञताभावाने संग्रहित करून ठेवले होते. त्यामुळेच या ग्रंथाचे संकलन करता आले. ग्रंथसंकलकांपैकी एक असलेल्या(पू.) सौ. अंजली गाडगीळ या परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या प्रतिनिधी म्हणून भारतभरातील विविध संतांशी समन्वय ठेवतात. त्यांनी या संतांविषयी वेळोवेळी करून ठेवलेले लिखाण या ग्रंथासाठी उपयुक्त ठरले. या ग्रंथात परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कार्याला साहाय्य करणाऱ्या विविध संतांची छायाचित्रे असल्याने हा ग्रंथ चैतन्ययुक्त झाला आहे. वाचकांनी त्याची अनुभूती घ्यावी.

संतांचे निरपेक्ष प्रेम, ते करत असलेले सूक्ष्मातील कार्य आणि त्यांचे अन्य संतांप्रतीचे भावविश्व हा ग्रंथ उलगडून दाखवतो. हा ग्रंथ वाचून जिज्ञासू आणि साधक यांच्या मनात संतांप्रती कृतज्ञताभाव जागृत व्हावा आणि त्यांनीही योग्य मार्गाने साधना करून संतत्वाच्या दिशेने वाटचाल करावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना! – **संकलक**